**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 17.08.2025** **वार- रविवार**

---

**<u>प्रतापराव जाधव</u>**

होमिओपॅथी ही पर्यायी वैद्यक पद्धती नसून, ती जगभरातील लाखो रुग्णांसाठी प्रभावी उपचार पद्धती ठरली आहे; होमिओपॅथीला प्रोत्साहन देण्यासाठी, केंद्र सरकार आयुष मंत्रालयामार्फत सातत्याने प्रयत्नशील आहे, असं प्रतिपादन केंद्रीय आयुष राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी आज पुण्यात केलं. 'नॅशनल कॉन्फरन्स ऑन हॅनिमॅनियन होमिओपॅथी' या परिषदेचं उद्घाटन जाधव यांच्या हस्ते आज झालं; त्यावेळी ते बोलत होते. देशभरातील नामांकित होमिओपॅथिक डॉक्टर, संशोधक आणि विद्यार्थी यावेळी उपस्थित होते. या परिषदेत होमिओपॅथीच्या मूलभूत तत्त्वांवर, संशोधनाच्या नव्या संधींवर तसंच वैद्यकीय उपचारांमध्ये होमिओपॅथीचं महत्त्व या विषयावर विचारमंथन करण्यात आलं. होमिओपॅथीचा सखोल अभ्यास करून जागतिक स्तरावर या उपचार पद्धतीचा प्रभाव वाढवण्याचा निर्धार सहभागी डॉक्टरांनी व्यक्त केला.

**<u>माजी लष्करप्रमुख</u>**

करिअरसाठी जे क्षेत्र निवडाल तिथे चांगलं काम करा, असं आवाहन करत स्वातंत्र्याबरोबर आलेल्या जबाबदारीचं भान ठेवा, असा मौलिक सल्ला माजी लष्करप्रमुख जनरल मनोज नरवणे यांनी दिला. पुण्यातील संस्कृती प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभामध्ये त्यांनी आज मार्गदर्शन केलं. यावेळी सातशे गुणवंत विद्यार्थ्यांना गौरवण्यात आलं. या उपक्रमाचं हे 23वं वर्ष आहे. केंद्रीय राज्य मंत्री मुरलीधर मोहोळ, क्रिकेटपटू केदार जाधव, अभिनेते प्रवीण तरडे, पुणे श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष ब्रीजमोहन पाटील आदि यावेळी उपस्थित होते.

**<u>पुरस्कार आशापारेख</u>**

ब्लॅक अँड व्हाईटच्या जमान्यापासून आताच्या एआयच्या काळापर्यंत चित्रपट क्षेत्रात झालेल्या विविध बदलांची मी साक्षीदार आहे; पण माझ्या दृष्टीने ब्लॅक अँड व्हाईटचा जमाना हाच चित्रपटांचा सुवर्णकाळ होता, असं मत ज्येष्ठ अभिनेत्री आशा पारेख यांनी पुण्यात व्यक्त केलं. पूना गेस्ट हाऊस स्नेहमंच, कोहिनूर कट्टा आणि विदिशा विचार मंच यांच्या वतीनं पारेख यांना आज 'कोहिनूर रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे; या निमित्तानं आयोजित विशेष वार्तालाप कार्यक्रमात त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

**<u>पुस्तकप्रकाशन</u>**

न्यायाधीश बंडोपंत कुलकर्णी यांनी लिहिलेल्या 'मुक्तांची अभंग वाट 'आणि 'ज्ञाना तू का जनी निळा, नामी गोरा?' या पुस्तकांचं प्रकाशन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती एन. के. जमादार आणि ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते आज पुण्यात झालं. न्यायासनावर बसल्यावर सर्व धारणा बाजूला ठेवून निष्पक्षपणे काम करावं लागतं; अशा वेळी अध्यात्माची जोड आणि संत विचारांची बैठक असल्यास निर्णय घेणं सोपं जातं, असं प्रतिपादन न्यायमूर्ती एन. के. जमादार यांनी यावेळी केलं. तर, बंडोपंत कुलकर्णी यांच्याकडे संत साहित्याकडे पाहण्याची वेगळी दृष्टी असून त्यांनी सगुण-निर्गुण द्वंद्वाचं उत्तम विवेचन केलं आहे, असं सदानंद मोरे म्हणाले.

**रेल्वे**

अमृत भारत स्थानक योजने अंतर्गत बारामती रेल्वे स्थानकाच्या नूतनीकरणाचं काम प्रगतीपथावर असून काम 86 टक्के पूर्ण झालं आहे. या कामासाठी 11 कोटी 40 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित असून येत्या 30 सप्टेंबरपर्यंत उर्वरित काम पूर्ण होईल, अशी माहिती रेल्वे विभागाने दिली आहे.

**पुणेमनपा**

पुणे महापालिका प्रशासनानं आरोग्य निरीक्षक आणि वरिष्ठ आरोग्य निरीक्षकांच्या बदल्या केल्या आहेत. यात 4 वरिष्ठ आरोग्य निरीक्षक तर 53 आरोग्य निरीक्षकांचा समावेश आहे.

**<u>मागणी</u>**

पुण्यातील जनता वसाहतीच्या पुनर्विकासासाठी डोंगरमाथा, डोंगरउतार या जागेवर 100 टक्के टीडीआर देण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. त्याचप्रमाणे जैवविविधता उद्यानाच्या आरक्षित जागेसाठी हा निर्णय होणं आवश्यक आहे, अशी मागणी माजी नगरसेवक उज्ज्वल केसकर, प्रशांत बधे आणि सुहास कुलकर्णी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

**<u>बाजार समिती</u>**

पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात आज महाराष्ट्रासह विविध  राज्यातून सुमारे शंभर ट्रक फळभाज्यांची आवक झाली. आवक वाढल्याने कारली, दोडका, भेंडी आणि काकडीच्या भावात घसरण झाली. पालेभाज्यांना मागणी चांगली असली तरी आवकही वाढल्याने करडई चाकवत आणि पुदिना यांचे दर दहा टक्क्यांपर्यंत खाली आले आहेत. फळ बाजारात लिंबांची आवक घटल्याने दर वाढले असून अन्य फळांचे भाव स्थिर आहेत. चांगल्या प्रतीच्या फुलांना मागणी असल्याने झेंडू शेवंती गुलछडी या फुलांचे दर वाढले आहेत.

**<u>क्रीडा</u>**

मुलींच्या वरिष्ठ गटाच्या अंतर जिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धा नुकत्याच पालघरमध्ये पार पडल्या. या स्पर्धेत पुणे जिल्हा महिला संघाने मुंबई संघाचा 2-1 असा पराभव करून विजेतेपद मिळवलं. पायल कोठारी आणि रितिका सिंग यांनी विजयी गोल केले. सर्वोत्कृष्ट खेळाडूचा मान पुण्याच्या रितिका सिंग हिला मिळाला. पुण्याची प्रेरणा मेश्राम सर्वोत्कृष्ट रक्षक खेळाडू तर अहिल्या नगरची सोमय्या शेख सर्वाधिक गोल करणारी खेळाडू ठरली.

**हवामान**

पुणे आणि परिसरात ढगाळ हवामान होतं. काही ठिकाणी पावसाच्या हलक्या सरींनी हजेरी लावली. उद्याही शहर परिसरात हलक्या पावसाची शक्यता असून घाट परिसरात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये.**

**नमस्कार**